॥ श्री ॥

आपली भूमी.. आपला आवाज...

# वीरभूमी

संपादक : महादेव दळे

www.veerbhuminews.com

*** सुविचार ***

अपयश हा यशाच्या मार्गावरील पहिला टप्पा आहे.

■ अहिल्यानगर ■ रविवार, दि. ९ ऑगस्ट २०२६ | ■ वर्ष ७ वे ■ अंक ६३ वा ■ पाने ४ ■ किंमत ३ रुपये | ■ RNI No. MAHMAR / 2012 / 47715 | 9420802145

## SPOT NEWS

### ११ ऑगस्टपासून गाई-म्हशीचे दूध महाग

● **मुंबई** – महागाईच्या झळा सहन करणा-या सर्वसामान्यांच्या खिशाला आता पुन्हा एकदा कात्री लागणार आहे. डिझेल, साखर आणि पॅकिंग साहित्याच्या दरात झालेल्या प्रचंड वाढीमुळे दूध उत्पादक आणि प्रक्रिया व्यावसायिकांनी दूध विक्रीच्या दरात प्रतिलिटर २ रुपयांची वाढ करण्याचा मोठा निर्णय घेतला आहे. हे नवे सुधारित दर येत्या मंगळवार, ११ ऑगस्टपासून लागू होणार असून केवळ दूधच नव्हे, तर दही, ताक, पनीर, तूप यांसारख्या विविध दुग्धजन्य पदार्थांच्या किमतीतही तब्बल १० टक्क्यांपर्यंत वाढ होणार आहे. राज्यातील सहकारी आणि खासगी डेअऱ्यांची शिखर संस्था असलेल्या 'दूध उत्पादक व प्रक्रिया व्यावसायिक कल्याणकारी संघाची' एक महत्त्वपूर्ण बैठक पुण्यात पार पडली. संघाचे अध्यक्ष गोपाळराव म्हस्के यांच्या अध्यक्षतेखाली कात्रज डेअरी येथे झालेल्या या बैठकीत सुमारे २० प्रमुख दूध संघांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

### सुप्रीम कोर्टावर दबाव आणण्याचा प्रयत्न? : ठाकरे

● **मुंबई** – देशातील तरुणांना आणि विद्यार्थ्यांना भेटायला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडे वेळ नाही, मात्र फुटून गेलेल्या गद्दार खासदारांना भेटायला त्यांच्याकडे वेळ आहे. गद्दारांना 'मी पाठीशी आहे' असे सांगून मोदींनी एक प्रकारे सर्वोच्च न्यायालयालाच धमकीवजा संदेश दिल्याची टीका केली आहे. गेल्या दोन महिन्यांपासून जगभरात आणि देशात 'झेनझी' पिढीने सरकारला कसे गुडघ्यावर आणले आहे, याचा संदर्भ देत ठाकरे म्हणाले, विद्यार्थ्यांच्या आंदोलनावर लाठीचार्ज झाला, अत्याचार झाले, ज्यामुळे जालियानवाला बाग हत्याकांडाची आठवण आली. तरीही या विद्यार्थ्यांशी कुणीही संवाद साधत नाही. पंतप्रधान मोदी त्यांना भेटत नाहीत, मात्र रात्री इन्स्टाग्रामवर व्हिडिओ टाकतात. आता यांची इन्स्टाग्रामवरून सरकार चालवण्याची वेळ आली आहे. कोरोनाकाळात जेव्हा मी फेसबुक लाईव्ह करत होतो, तेव्हा हेच लोक मला ट्रोल करत होते. देशातल्या तरुणांना भेटायला यांना वेळ नाही, मात्र गद्दारांना भेटायला वेळ आहे. बंद दाराआड मोदींनी या खासदारांना सांगितले की, भिऊ नका, मी तुमच्या पाठीशी आहे. मग हे वाक्य बंद दारातून बाहेर कसे आले? हा थेट सर्वोच्च न्यायालयाला किंवा सरकारला दिलेला धमकीवजा संदेश आहे का? याचा खुलासा झाला पाहिजे.

# पुण्यात डेंग्यू, चिकुनगुनियाचा धोका वाढला

## महापालिका हद्दीत सात महिन्यांत ६७१ संशयित रुग्ण आढळले

● **पुणे । वीरभूमी** –

शहरात पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर डेंग्यू आणि चिकुनगुनियाचा धोका वाढला आहे. जानेवारी ते जुलैदरम्यान डेंग्यूचे तब्बल ६७१ संशयित रुग्ण आढळले असून, त्यापैकी २७ जणांना डेंग्यूची लागण झाल्याचे स्पष्ट झाले आहे. जुलैमध्येच सर्वाधिक ३२३ संशयित आणि १२ बाधित रुग्ण आढळल्याने आरोग्य यंत्रणा सतर्क झाली आहे. दरम्यान, चिकुनगुनियाचे सात, तर मलेरियाचा एक रुग्ण आढळला आहे. या आजारांमुळे अद्याप शहरात एकाही मृत्यूची नोंद झालेली नाही.

महापालिकेच्या कीटक प्रतिबंधक विभागाच्या आकडेवारीनुसार, २६ जुलै ते १ ऑगस्ट या काळात डेंग्यूच्या रुग्णसंख्येत वेगाने भर पडली आहे. जानेवारीपासून आतापर्यंत शहरात डेंग्यूचे ६७१ संशयित रुग्ण (एनएस१) सापडले आहेत. त्यापैकी २७ रुग्णांच्या एनआयव्ही चाचण्या सकारात्मक आल्या आहेत.




शहरातील विविध भागांत घरांच्या गच्चीवर, फुलझाडांच्या कुंड्या, टायर तसेच बांधकामांच्या ठिकाणी साचलेल्या पाण्यात डेंग्यूच्या डासांची उत्पत्ती होत असल्याचे सर्वेक्षणात आढळून आले आहे. त्यामुळे महापालिकेच्या पथकांकडून डासांची उत्पत्ती स्थळे नष्ट करण्यासाठी नियमित तपासणी आणि अबेटिंगची कारवाई सुरू आहे.

जानेवारी ते जुलै २०२६ या सात महिन्यांत कीटक प्रतिबंधक विभागाने २१,०३,३०४ कंटेनरची तपासणी केली. त्यापैकी १२,९८४ कंटेनर डास उत्पत्तीसाठी धोकादायक आढळले. या कालावधीत ८,५७० दूषित घरे आढळून आली असून, संबंधितांवर कायदेशीर कारवाई करण्यात आली. या काळात १०,०३,३६८ खासगी व सार्वजनिक मिळकतींमध्ये अबेटिंग करण्यात आले. डासांची उत्पत्तीस्थाने नष्ट करण्याबरोबरच धूरफवारणी आणि औषध फवारणीही करण्यात आली.

जुलैमध्ये सर्वाधिक ३,६७,८१४ कंटेनरची तपासणी करण्यात आली. त्यापैकी २,२९४ कंटेनर दूषित आढळले. या महिन्यात १,७६,०८९ मिळकतींमध्ये अबेटिंग, तर ३१,५३६ घरांमध्ये औषध फवारणी करण्यात आली. नियमभंगप्रकरणी ५२४ नोटिसा बजावून १,२२,५०० रुपयांचा दंड वसूल करण्यात आला.

डासांची उत्पत्तीस्थळे आढळलेल्या ठिकाणी महापालिकेने कारवाई करून प्रशासकीय शुल्क व दंडाच्या माध्यमातून ३,३५,००० रुपयांपेक्षा अधिक रक्कम वसूल केली आहे. कीटकशास्त्रीय निर्देशांकातही जुलैमध्ये वाढ झाल्याचे दिसून येत असल्याने पावसाळ्यात डासांची उत्पत्ती रोखण्यासाठी उपाययोजनांना वेग देण्यात आला आहे.

### नागरिकांनी कोरडा दिवस पाळावा

■ घराच्या परिसरात तसेच सार्वजनिक ठिकाणी पाणी साचणार नाही, याची नागरिकांनी दक्षता घ्यावी. पाण्याच्या टाक्या, भांडी आणि अन्य पाणी साठविणारी पात्रे झाकून ठेवावीत. आठवड्यातून एक दिवस घरातील सर्व पाणीसाठे रिकामे करून कोरडा दिवस पाळावा, असे आवाहन महापालिकेच्या कीटक प्रतिबंधक विभागाने केले आहे.

## राज्यात १३ ऑगस्टपासून पावसाचा जोर पुन्हा वाढणार

● **मुंबई । वीरभूमी** –

गेल्या काही दिवसांपासून पावसाने विश्रांती घेतली होती. मात्र, आता हवामानात पुन्हा बदल होण्याचे संकेत आहेत. त्यामुळे महाराष्ट्रात पावसाचा जोर वाढू शकतो. १३ ते २० ऑगस्ट या काळात विदर्भ, मध्य महाराष्ट्र आणि कोकणात सरासरीपेक्षा जास्त पाऊस होण्याची शक्यता आहे. तसेच २० ते २७ ऑगस्ट दरम्यान राज्यातील विविध भागांमध्ये पाऊस सुरूच राहण्याची शक्यता आहे, असे ज्येष्ठ हवामानशास्त्रज्ञ कृष्णानंद होसाळीकर यांनी सांगितले आहे.

हवामान विभागाने हवामानासंबंधित एक महत्त्वपूर्ण अंदाज जाहीर केला आहे. येत्या २४ तासांत बंगालच्या उपसागरात कमी दाबाचे क्षेत्र निर्माण होण्याचा इशारा दिला आहे. तसेच चालू महिन्यात महाराष्ट्रात पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

दक्षिण पश्चिम बंगाल आणि त्याला लागून असलेल्या बांगलादेशच्या आकाशात चक्राकार वारे वाहत आहेत. या कारणामुळे पुढील २४ तासांत पश्चिम बंगालची किनारपट्टी आणि वायव्य बंगालच्या उपसागरात कमी दाबाचे क्षेत्र तयार होणार आहे.

दरम्यान, पर्यटन स्थळ म्हणून प्रसिद्ध असलेल्या महाबळेश्वरमध्ये मागील २४ तासांत ८२.५ मि.मी. पाऊस पडला आहे. तर या हंगामात एकूण ५ हजार १६ मि.मी. पाऊस नोंदविण्यात आला आहे.

ओडिशाच्या काही भागांत अतिशय मुसळधार पाऊस पडू शकतो. केरळ, कर्नाटक (किनारपट्टी व दक्षिण भाग), पूर्व मध्य प्रदेश, पूर्व राजस्थान या राज्यांमध्ये मुसळधार पाऊस पडू शकतो. मध्य महाराष्ट्र, बिहार, छत्तीसगड, उत्तराखंड, दिल्ली, हरियाणा, आसाम आणि ईशान्येकडील राज्यांमध्ये चांगल्या पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

## दारूच्या वादातून तरुणाचा खून; चौघे आरोपी अटकेत

### अपहरण करून मारहाणीनंतर मृतदेह पिंपळगाव खांड जलाशयात फेकला

● **अकोले । वीरभूमी** –

अवैध देशी दारू विक्रीच्या कारणावरून वारंवार वाद होत असल्याच्या रागातून एका तरुणाचे अपहरण करून त्याचा खून केल्याची धक्कादायक घटना अकोले तालुक्यात घडली. मच्छिंद्र ऊर्फ सचिन किसन वाकचौरे (वय ३७, रा. पिंपळगाव निपाणी, ता. अकोले) याचा खून करून पुरावा नष्ट करण्याच्या उद्देशाने मृतदेह पिंपळगाव खांड धरणाच्या पाण्यात फेकून देण्यात आल्याचे पोलिस तपासात समोर आले आहे.




याप्रकरणी मयताचा भाऊ पोपट किसन वाकचौरे यांनी अकोले पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार सचिन सुदाम जाधव (वय ३२, रा. नवलेवाडी, ता. अकोले, मूळ रा. पोखरीबाळेश्वर, ता. संगमनेर), दिगंबर रामनाथ रोकडे (वय ३५, रा. वडगाव लांडगा, ता. संगमनेर), संदेश लक्ष्मण उघडे (वय २९, रा. विठे ठाकरवाडी, ता. अकोले) आणि श्रीकांत राजेंद्र डोंगरे (वय २६, रा. राजापूर रोड, बुळकुंडे मळा, ढोलेवाडी, ता. संगमनेर) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादीनुसार, मच्छिंद्र ऊर्फ सचिन वाकचौरे याचा सचिन जाधव याच्या अवैध देशी दारू विक्रीच्या ठिकाणी अनेकदा वाद झाला होता. या वादाचा राग मनात धरून २६ जुलै रोजी दुपारी ३ ते ३.३० वाजेपासून ७ ऑगस्ट रोजी दुपारी ३ वाजेच्या दरम्यान घामोडी फाटा परिसरातून वाकचौरे याचे अपहरण करण्यात आले. आरोपींनी त्याला मारहाण करून व्हॅलेरो वाहनातून नेले. त्यानंतर त्याचा खून करून मृतदेह पिंपळगाव खांड धरणाच्या पाण्यात फेकून दिल्याचे फिर्यादीत नमूद आहे.

याप्रकरणी अकोले पोलिस ठाण्यात गुन्हा रजिस्टर नंबर ५१३/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता कलम १४०(१), १०३(१), २३८ व ३(५) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी ७ ऑगस्ट रोजी आरोपी क्रमांक १ ते ३ यांना अटक करून न्यायालयात हजर केले. न्यायालयाने त्यांना १२ ऑगस्टपर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे. आरोपी क्रमांक ४ श्रीकांत राजेंद्र डोंगरे याला रविवारी दुपारी अटक करण्यात आली.

दरम्यान, पोलिसांनी शोध घेतल्यानंतर ७ ऑगस्ट रोजी दुपारनंतर मयत वाकचौरे याचा मृतदेह पिंपळगाव खांड जलाशयात आढळून आला.

या घटनेचा पुढील तपास पोलिस निरीक्षक संदीप कोळी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक समाधान फडोळ करीत आहेत. या प्रकरणातील मुख्य आरोपी सचिन सुदाम जाधव हा अवैध दारू विक्रीचा व्यवसाय करत असून, त्याच्याविरुद्ध सुमारे २० विविध गुन्हे दाखल असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

# राष्ट्रीय नागरी सहकारी विकास महामंडळाचे मुख्यालय मुंबईत

## दिल्लीतून हलवणार मुख्यालय । केंद्रीय गृह तथा सहकारमंत्री अमित शाह यांची घोषणा

● **मुंबई । वीरभूमी** –

अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकिंग क्षेत्राला आधुनिक, पारदर्शक, विश्वासार्ह आणि तंत्रज्ञानाधिष्ठित बनविण्यासाठी 'अंब्रेला ऑर्गनायझेशन' महत्त्वाची भूमिका बजावणार आहे. या माध्यमातून देशातील प्रत्येक तहसीलपर्यंत अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकिंगचे जाळे विस्तारण्याला मोठी चालना मिळेल, असा विश्वास केंद्रीय गृह तथा सहकारमंत्री अमित शाह यांनी व्यक्त केला. राष्ट्रीय शहरी सहकारी वित्त व विकास महामंडळाचे मुख्यालय दिल्लीत होते मात्र आजच सकाळी मी हे मुख्यालय महाराष्ट्रात आणण्याचा निर्णय घेतला असल्याची घोषणाही अमित शाह यांनी या वेळी केली.

बीएसई इंटरनॅशनल कन्व्हेन्शन सेंटर, मुंबई येथे आयोजित सहकार नव-क्रांती मेळावा कार्यक्रमात ते बोलत होते. या कार्यक्रमास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, केंद्रीय सहकार राज्यमंत्री कृष्णपाल गुर्जर, केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, पणनमंत्री जयकुमार रावल, सहकारमंत्री बाबासाहेब पाटील, राष्ट्रीय नागरी सहकारी वित्त विकास महामंडळाचे अध्यक्ष ज्योतिंद्र मेहता, केंद्रीय सहकार मंत्रालयाचे सचिव डॉ. आशिष कुमार भुटानी तसेच अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

केंद्रीय सहकारमंत्री अमित शहा म्हणाले की, देशातील प्रत्येक अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकेने अगदी एका शाखेच्या बँकेनेही अंब्रेला ऑर्गनायझेशनचे सदस्यत्व घ्यावे. सदस्यत्व घेतल्यानंतर सुरक्षा संचालन केंद्राशी जोडले जावे. यामुळे बँकांमधील ठेवीदारांचा विश्वास वाढण्यास मदत होईल आणि बँकिंग क्षेत्र अधिक सुरक्षित होईल. अंब्रेला संस्था बँकिंग क्षेत्रात करण्यात येत असलेल्या नवीनतम सुधारणांची माहिती तसेच म्यूल हंटरसारख्या अनेक आवश्यक



सॉफ्टवेअर सुविधादेखील या माध्यमातून उपलब्ध करून दिल्या जातील. या अंब्रेला संस्थेच्या मदतीने कर्मचाऱ्यांसाठी प्रशिक्षण कार्यक्रमही आयोजित करता येतील, जे कर्मचाऱ्यांसाठी अत्यावश्यक ठरणार आहे. स्पर्धात्मक बँकिंग क्षेत्रात इतरांच्या बरोबरीने उभे राहण्यासाठी तसेच जनता आणि रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचा विश्वास संपादन करण्यासाठी अंब्रेला संस्था मार्गदर्शक ठरणार असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

देशातील सुमारे १,४०० अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकांमध्ये जवळपास ६ लाख कोटी रुपयांच्या ठेवी आहेत. देशाच्या आर्थिक विकासात या बँकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. छोटे दुकानदार, व्यापारी, कुटीर उद्योग, एमएसएमई, स्थानिक व्यावसायिक, महिला बचत गट तसेच मध्यमवर्गीयांच्या विविध गरजा पूर्ण करण्यासाठी छोट्या कर्जांची आवश्यकता असते. मोठ्या बँकांना अनेकदा या गरजा पूर्ण करणे शक्य होत नाही. मात्र, तालुका पातळीवरील अर्बन को-ऑपरेटिव्ह बँका ही भूमिका प्रभावीपणे पार पाडू शकतात. कर्जाची रक्कम जितकी कमी, तितकी त्याची परतफेडीची शक्यता अधिक असते. कोणत्याही हमी किंवा तारणाशिवाय कर्ज देण्याची मर्यादा आता अडीच लाख रुपयांवरून ५ लाख रुपये करण्यात आली. या योजनेतील तब्बल ९९.७८ टक्के कर्जे व्याजासह परतफेड झाली आहेत. यावरून छोट्या कर्जदारांची कर्जफेडीची क्षमता स्पष्ट होते, असे त्यांनी नमूद केले.

### बँकिंग क्षेत्रात महाराष्ट्र राज्याचे योगदान मोठे

■ महाराष्ट्रात ४४९ सहकारी बँका असून देशातील सहकारी बँकिंग क्षेत्रात महाराष्ट्राचे मोठे योगदान आहे. महाराष्ट्रासह गुजरात, गोवा आणि कर्नाटक या राज्यांमध्ये देशातील मोठ्या प्रमाणावर शहरी सहकारी बँका कार्यरत आहेत. त्यामुळे शहरी सहकारी बँकिंग क्षेत्राच्या अंब्रेला संस्थेचे मुख्यालय महाराष्ट्रात असणे अधिक उपयुक्त ठरेल, असे शाह म्हणाले.

# SPOT NEWS

## परदेशी युवा प्रतिनिधींना नगरमध्ये ‘अतिथी देवो भव’ची अनुभूती

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

लायन्स इंटरनॅशनल युवा देवाणघेवाण कार्यक्रमांतर्गत तुर्कस्तान, बेल्जियम, डेन्मार्क आणि हंगेरी येथील चार युवा प्रतिनिधींनी अहिल्यानगरात भारतीय संस्कृती, कुटुंबव्यवस्था, परंपरा आणि सेवाभावाचा अविस्मरणीय अनुभव घेतला. २३ दिवसांच्या या कार्यक्रमात पहिल्या ११ दिवसांत त्यांनी भारतीय यजमान कुटुंबांमध्ये वास्तव्य केले. डेफ्ने एर्सेन, ईव्हा-लुना बेलॉय, एलियट केलर लॉरिट्झेन आणि फाबोक मॅत्यास यांनी भारतीय कुटुंबातील प्रेम, जिव्हाळा, पाहुणचार आणि वडीलधाऱ्यांप्रती आदर अनुभवला. मुक्कामादरम्यान त्यांनी आषाढी एकादशी दिंडीत सहभाग घेतला, फुगडी खेळली, गणपती ढोल वाजविला, पोळी बनविणे शिकले तसेच मराठी, हिंदी आणि पंजाबी भाषेतील दैनंदिन शब्द आत्मसात केले. श्री विशाल गणपती मंदिर, गुरुद्वारा भाई दयासिंगजी, शिर्डी, शनिशिंगणापूर आणि वेरूळ लेणी यांसह विविध ऐतिहासिक व धार्मिक स्थळांना त्यांनी भेटी दिल्या. गुरु अर्जुन सामाजिक प्रतिष्ठानच्या ‘घर घर लंगर सेवा’ प्रकल्पातील निःस्वार्थ सेवा पाहून प्रतिनिधी भारावले. रामकृष्ण ज्युनिअर कॉलेजमध्ये विद्यार्थ्यांशी संवाद साधत त्यांनी संस्कृती व शिक्षणपद्धतीची देवाणघेवाण केली. भारतामध्ये पर्यटक म्हणून आलो; मात्र आता आम्हाला दुसरे कुटुंब मिळाले आहे, अशी भावना प्रतिनिधींनी व्यक्त केली. लायन्स क्लब ऑफ अहमदनगरच्या सहकार्याने हा उपक्रम यशस्वी झाला.

## निमगाव वाघात शिक्षक दिनी रंगणार ग्रामीण मराठी साहित्य संमेलन

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

स्व.पै. किसनराव डोंगरे बहुद्देशीय संस्था, श्री नवनाथ युवा मंडळ आणि धर्मवीर ग्रामीण सार्वजनिक वाचनालयाच्या वतीने निमगाव वाघा (ता. नगर) येथे शिक्षक दिनानिमित्त राज्यस्तरीय ग्रामीण मराठी साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. हे आठवे ग्रामीण मराठी साहित्य संमेलन असून, यामध्ये राज्यभरातील ज्येष्ठ साहित्यिक व कवी सहभागी होणार असल्याची माहिती संमेलनाचे संयोजक पै. नाना डोंगरे यांनी दिली. ५ सप्टेंबरला होणाऱ्या साहित्य संमेलनानिमित्त गावातून ग्रंथ दिंडी काढली जाणार आहे. या दिंडीत साहित्यिक व कवी सहभागी होणार आहेत. यानंतर परिवार मंगल कार्यालयात मान्यवरांच्या हस्ते संमेलनाचे औपचारिक उद्घाटन होणार आहे. यावेळी ज्येष्ठ साहित्यिक व विचारवंत यांचे परिसंवाद आणि व्याख्याने आयोजन करण्यात आले आहे. मध्य सत्रात कवी संमेलन रंगणार असून, त्याद्वारे ग्रामीण भागातील काव्यप्रतिभेला व्यासपीठ उपलब्ध करुन देण्यात आले आहे. वाचन संस्कृती वृद्धिंगत करण्याच्या उद्देशाने ग्रंथ प्रदर्शन व ग्रंथ विक्रीचेही आयोजन करण्यात आले आहे. संमेलनात पाहुण्यांच्या हस्ते सामाजिक, साहित्य, आरोग्य, शैक्षणिक, कला, क्रीडा, उद्योग व पर्यावरण आदी विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना पुरस्कार प्रदान केले जाणार आहेत. या पुरस्कारासाठी इच्छुकांनी प्रस्ताव २५ ऑगस्ट पर्यंत पै. नाना किसन डोंगरे, अध्यक्ष, स्व. पै. किसनराव डोंगरे बहुद्देशीय संस्था, निमगाव वाघा, ता. नगर, जि. अहिल्यानगर - ४१४००५. या पत्त्यावर पाठविण्याचे आवाहन करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी पै. नाना डोंगरे यांच्याशी ९२२६७३५३४६ / ८६०५७७५२६१ या नंबरवर संपर्क साधण्याचे म्हंटले आहे.

# पाथरवाला येथील मारुती मंदिरासमोरील बारव शिलालेखातून उलगडला २५६ वर्षांपूर्वीचा जलव्यवस्थापनाचा इतिहास

### त्रिंबक भिवदेव कुलकर्णींनी सन १७७० मध्ये बांधली विहीर । शके १६९२ आणि फसली सन ११८० चा दुहेरी कालोल्लेख

**■ विजय उंडे**

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

नेवासा तालुक्यातील पाथरवाला गावात मारुती मंदिरासमोरील बारवेच्या पायऱ्यांवर आढळून आलेला शिलालेख अठराव्या शतकातील गावजीवन, जलव्यवस्थापन आणि तत्कालीन ग्रामप्रशासनावर महत्त्वपूर्ण प्रकाश टाकणारा ऐतिहासिक पुरावा ठरत आहे. शके १६९२, विकृती नाम संवत्सर, भाद्रपद शुद्ध प्रतिपदा म्हणजेच २१ ऑगस्ट १७७०, मंगळवार या दिवशी मौजे पाथरवाला येथील त्रिंबक भिवदेव कुलकर्णी यांनी ही विहीर बांधल्याची नोंद या शिलालेखात करण्यात आली आहे.

गावाच्या पूर्वेला ग्रामपंचायत कार्यालयाशेजारी मारुती मंदिरासमोर असलेल्या बारवेच्या पायऱ्या उतरताना उजव्या बाजूला एका शिळेवर हा शिलालेख कोरलेला आहे. हा लेख उठाव स्वरूपाचा असून पाच ओळींचा आहे. देवनागरी लिपीत आणि मराठी भाषेत कोरलेला हा शिलालेख अनेक वर्षे उघड्यावर असल्याने वातावरणाच्या परिणामामुळे काही अक्षरे पुसट व झिजलेली आहेत. मात्र लेखाचा छाप घेतल्यानंतर त्यावरील मजकूर स्पष्टपणे वाचता येतो.

**शिलालेखाचे मूळ वाचन**

**१.सके १६९२ ईकृती नाम सं**
**२.मछरे भाद्रपद सुद पाडवा ते**
**३.दिवसी त्रीबक भीवदेऊ कु**
**४.लकरनी मौजे पाथवाल वि**
**५.हीर फसली सन ११८०**


■ छाया । विजय उंडे

शिलालेखाच्या वाचनावरून शके १६९२, विकृती नाम संवत्सर, भाद्रपद शुद्ध पाडवा या दिवशी त्रिंबक भिवदेव कुलकर्णी यांनी पाथरवाला येथे विहीर बांधल्याचे स्पष्ट होते. लेखाच्या अखेरीस फसली सन ११८० अशी स्वतंत्र कालगणनाही नमूद करण्यात आली आहे.

या शिलालेखाचे वैशिष्ट्य केवळ विहिरीच्या बांधकामाची नोंद एवढ्यापुरते मर्यादित नाही. अठराव्या शतकातील ग्रामीण समाजात पाण्याच्या स्रोतांना असलेले महत्त्व या लेखातून अधोरेखित होते. पिण्याचे पाणी, शेती आणि दैनंदिन गरजा भागविण्यासाठी विहिरी, बारवा आणि इतर जलस्रोतांची उभारणी ही तत्कालीन लोकजीवनाची अत्यावश्यक गरज होती.

विशेष म्हणजे विहीर बांधणाऱ्या व्यक्तीचे नाव ‘त्रिंबक भिवदेव कुलकर्णी’ असे स्पष्टपणे नमूद आहे. कुलकर्णी हे तत्कालीन गावच्या प्रशासनातील महत्त्वाचे अधिकारी होते. त्यामुळे महसूल आणि लेखापरीक्षणाच्या जबाबदाऱ्यांबरोबरच ग्रामहिताच्या कामांतही अशा अधिकाऱ्यांचा सहभाग असल्याचे या शिलालेखातून दिसून येते.

शिलालेखात ‘मौजे पाथवाल’ असा गावाचा उल्लेख आढळतो. यावरून पाथरवाला गावाच्या अठराव्या शतकातील अस्तित्वाचा ठोस पुराभिलेखीय पुरावा उपलब्ध होतो. स्थानिक इतिहास, गावांची प्राचीनता, तत्कालीन प्रशासकीय व्यवस्था आणि ऐतिहासिक भूगोलाच्या अभ्यासासाठी ही नोंद महत्त्वपूर्ण ठरते.

या लेखात शालिवाहन शकाबरोबरच फसली सन ११८० ही कालगणनाही नमूद करण्यात आली आहे. एकाच शिलालेखात दोन वेगवेगळ्या कालगणनांचा वापर झाल्यामुळे तत्कालीन प्रशासकीय आणि सामाजिक व्यवहारात प्रचलित असलेल्या कालमापन पद्धतींच्या अभ्यासालाही या लेखातून महत्त्वपूर्ण आधार मिळतो.

देवनागरी लिपी आणि मराठी भाषेत कोरलेला हा शिलालेख मराठाकालीन लेखनपद्धती, भाषाशैली, शब्दरचना, व्यक्तिनामे, स्थाननामे आणि प्रशासकीय संज्ञांच्या अभ्यासासाठीही उपयुक्त आहे. लेखातील ‘कुलकर्णी’, ‘मौजे’ यांसारख्या संज्ञांमधून तत्कालीन ग्रामप्रशासनाची झलक मिळते.

विशेष म्हणजे विहिरीसारख्या लोकउपयोगी वास्तूच्या निर्मितीची नोंद दगडावर करून ठेवण्याची परंपरा तत्कालीन समाजात अस्तित्वात होती, याचीही हा लेख साक्ष देतो. त्यामुळे हा केवळ बांधकामाचा उल्लेख नसून त्या काळातील सामाजिक स्मृती जतन करण्याचे एक माध्यम म्हणूनही त्याकडे पाहता येते.

आजपासून सुमारे २५६ वर्षांपूर्वी बांधण्यात आलेली ही विहीर आणि तिच्यावरील शिलालेख तत्कालीन ग्रामीण महाराष्ट्रातील जलसंस्कृतीचे दर्शन घडवितो. आधुनिक जलव्यवस्थेची साधने उपलब्ध नसताना गावाच्या गरजा लक्षात घेऊन निर्माण करण्यात आलेल्या जलस्रोतांची ऐतिहासिक परंपरा या शिलालेखामुळे अधोरेखित होते.

पाथरवाला येथील हा शिलालेख त्यामुळे स्थानिक इतिहासापुरता मर्यादित न राहता मराठाकालीन जलव्यवस्थापन, ग्रामप्रशासन, लोकहिताची कामे, कालगणना आणि सामाजिक जीवनाचा अभ्यास करणाऱ्या संशोधकांसाठी महत्त्वाचा पुराभिलेख ठरतो.

या शिलालेखाची माहिती, संशोधन व वाचन पुणे येथील अनिल किसन दुधाणे यांनी केले आहे त्यांना नवनाथ आहेर, अमोल खाटीक, संदीप खाटीक यांनी सहकार्य केले आहे.

## महंत नामदेव महाराज शास्त्री यांच्यावर अँजिओप्लास्टी यशस्वी; प्रकृती स्थिर

### भाविकांनी रुग्णालयात भेटीसाठी येऊ नये, आवाहन



**● पाथर्डी । वीरभूमी–**

श्री क्षेत्र भगवानगडाचे महंत न्यायाचार्य डॉ. श्री. नामदेव महाराज शास्त्री यांना अचानक छातीत त्रास जाणवल्याने त्यांच्यावर अहिल्यानगर येथील खाजगी हॉस्पिटलमध्ये तातडीने अँजिओप्लास्टी शस्त्रक्रिया करण्यात आली. ही शस्त्रक्रिया यशस्वी झाली असून त्यांची प्रकृती सध्या स्थिर आहे.

डॉ. सुहास हरदास, डॉ. संदीप गाडे आणि डॉ. महेश घुगे यांच्या देखरेखीखाली त्यांच्यावर पुढील काही दिवस उपचार सुरू राहणार आहेत. वैद्यकीय उपचारांदरम्यान त्यांना विश्रांतीची आवश्यकता असल्याने भाविक, भक्त आणि हितचिंतकांनी रुग्णालयात भेटण्यासाठी येण्याचा आग्रह धरू नये, असे आवाहन करण्यात आले आहे. तसेच शास्त्रीजींच्या भेटीसाठी हॉस्पिटल प्रशासन किंवा डॉक्टरांशी संपर्क साधू नये आणि रुग्णालयात येणे टाळावे, अशी विनंती करण्यात आली आहे.

रुग्णालयातून सुटी मिळाल्यानंतर शास्त्रीजी श्री क्षेत्र भगवानगड येथे भाविकांना भेटणार असून, भेटीची तारीख नंतर जाहीर करण्यात येणार आहे.

शास्त्रीजींवर उपचार करणारे डॉक्टर, नर्स आणि वैद्यकीय कर्मचाऱ्यांनी दाखविलेल्या सेवाभावाबद्दल श्री क्षेत्र भगवानगडाच्या भाविक-भक्तांच्या वतीने त्यांचे आभार व्यक्त करण्यात आले आहेत.

## अविनाश पवार यांना ‘विश्वबंधुता प्रकाशदूत साहित्य पुरस्कार’

**● पारनेर । वीरभूमी–**

‘विश्वबंधुतेचा तिरंगा महोत्सव २०२६’च्या पार्श्वभूमीवर पुणे येथे आयोजित विशेष सोहळ्यात विश्वबंधुता साहित्य परिषद, पुणे तसेच विश्वबंधुता काव्यमंच आणि काव्य प्रकाशन यांच्या संयुक्त विद्यमाने सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल अविनाश पवार यांना मानाचा ‘विश्वबंधुता प्रकाशदूत साहित्य पुरस्कार’ प्रदान करण्यात आला.

बंधुताचार्य प्रकाश रोकडे आणि ॲड. प्रार्थना सदावर्ते यांच्या हस्ते पवार यांचा पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला. यावेळी स्वागताध्यक्ष डॉ. बंडोपंत कांबळे, ज्येष्ठ साहित्यिक चंद्रकांत वानखेडे, कवयित्री संगीता झिंजुरके, प्रा. शंकर अथरे, मंदाकिनी रोकडे आदी मान्यवर उपस्थित होते.


■ छाया । भगवान गायकवाड

पुणे शहरात प्रेरणादायी वातावरणात पार पडलेल्या या सोहळ्यात अविनाश पवार यांच्या सामाजिक कार्याची दखल घेत त्यांना सन्मानित करण्यात आले. त्यांच्या या गौरवामुळे पारनेर तालुक्याच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला गेला आहे.

या कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण ठरले ते अविनाश पवार यांना प्रदान करण्यात आलेले सन्मानपत्र. त्यामध्ये त्यांच्या साहित्यिक आणि सामाजिक कार्याचा गौरवपूर्ण शब्दांत उल्लेख करण्यात आला आहे. बदलत्या सामाजिक परिस्थितीत लोकशाही मूल्यांचे रक्षण करणे, तसेच तळागाळातील नागरिकांपर्यंत समता आणि बंधुतेचा संदेश पोहोचविणे हे सामाजिक कार्यकर्त्याचे कर्तव्य आहे. हे कर्तव्य अविनाश पवार यांनी सामाजिक कार्यातून प्रभावीपणे बजावल्याचे गौरवोद्गार यावेळी काढण्यात आले.

या संमेलनास व पुरस्कार वितरण सोहळ्यास पुणे आणि परिसरातील अनेक नामांकित साहित्यिक, विचारवंत, कवी तसेच सामाजिक क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. विश्वबंधुता साहित्य परिषदेचे पदाधिकारी आणि काव्यमंचाच्या कार्यकर्त्यांनी सोहळा यशस्वी करण्यासाठी विशेष परिश्रम घेतले.

# नवीपेठेतील बेशिस्त पार्किंगचा नागरिकांना मनस्ताप

### व्यापाऱ्यांचे नुकसान; रुग्णवाहिका, अग्निशामक वाहनांनाही अडथळा । बंदिस्त नाट्यगृहात पार्किंगची मागणी

**● पाथर्डी । वीरभूमी –**

शहरातील मुख्य बाजारपेठ असलेल्या नवीपेठ परिसरात अस्ताव्यस्त वाहन पार्किंगची समस्या दिवसेंदिवस गंभीर होत आहे. याचा व्यापारी, ग्राहक तसेच परिसरातील नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. रस्त्यावरच वाहने उभी राहत असल्याने आपत्कालीन परिस्थितीत रुग्णवाहिका व अग्निशामक वाहनांना इच्छित स्थळी पोहोचणेही अडचणीचे ठरत आहे. पालिका पदाधिकारी व अधिकाऱ्यांकडे वारंवार तोंडी तसेच लेखी तक्रारी करूनही ठोस उपाययोजना होत नसल्याने, मोठा अनर्थ घडल्यानंतरच पालिका यंत्रणेचे डोळे उघडणार का, असा संतप्त सवाल नागरिकांतून केला जात आहे.

नवीपेठ परिसरात पार्किंगबरोबरच सार्वजनिक शौचालयाचीही मोठी समस्या आहे. बाहेरगावाहून खरेदीसाठी येणाऱ्या ग्राहकांना वाहन पार्किंगची सुविधा उपलब्ध नसल्याने अनेक ग्राहकांनी नवीपेठ बाजारपेठेकडे पाठ फिरवली आहे. त्याचा फटका गेल्या काही वर्षांपासून येथील व्यापाऱ्यांना बसत आहे. त्यामुळे नवीपेठ, क्रांती चौक, अजंठा चौक, राष्ट्रसंत श्री. आनंदऋषीजी महाराज मार्ग, आष्टवाडा आदी भागांतील बाजारपेठ शेवगाव रोड, नगर रोड आदी भागांत विखुरली आहे.

अष्टवाडा, कसबा, सिनेमा गल्ली, लकार गल्ली, कासार गल्ली, सुतार गल्ली आदी भागांतील नागरिकांना नवीपेठेतूनच ये-जा करावी लागते. मात्र, येथे नियमितपणे होणाऱ्या बेशिस्त पार्किंगमुळे वाहतुकीचा खोळंबा होऊन व्यापारी आणि नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे.

या समस्येबाबत तोंडी व लेखी निवेदने देण्याबरोबरच मोर्चे व आंदोलनेही झाली आहेत. अधिकारी व पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत अनेक बैठका पार पडल्या. मात्र, अद्याप ठोस तोडगा निघालेला नाही. पुढील आठवड्यापासून श्रावण महिना तसेच विविध सण-उत्सव सुरू होत असल्याने बाजारपेठेत ग्राहकांची वर्दळ वाढणार आहे. त्यामुळे पार्किंगचा प्रश्न आणखी गंभीर होण्याची शक्यता आहे.

विशेष म्हणजे नवीपेठ येथे सुमारे पाच कोटी रुपये खर्च करून विविध कार्यक्रमांसाठी प्रशस्त बंदिस्त नाट्यगृहाचे (ओपन थिएटर) नूतनीकरण करण्यात आले आहे. मात्र, वर्षभरात येथे बोटावर मोजण्याइतकेही कार्यक्रम होत नसल्याने या जागेचा अपेक्षित वापर होत नाही.


■ छाया । अनिल खाटेर

हे नाट्यगृह वर्षभर खुले करून चारचाकी व दुचाकी वाहनांसाठी नाममात्र दरात पार्किंग सुविधा उपलब्ध करून दिल्यास नागरिकांची मोठी समस्या सुटण्याबरोबरच नगरपालिकेलाही उत्पन्नाचे साधन उपलब्ध होऊ शकते. नाट्यगृह बंदिस्त असल्याने ऊन, वारा व पावसापासून वाहने सुरक्षित राहतील. तसेच येथे सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची सुविधा असल्याने वाहनांच्या सुरक्षेचीही काळजी घेतली जाऊ शकते. याशिवाय नाट्यगृहातील सुसज्ज शौचालयाचा नागरिकांना वापर करता येणार असल्याने महिला वर्गासह सर्व नागरिकांची मोठी गैरसोय दूर होण्यास मदत होईल.

पालिकेने या समस्येची गांभीर्याने दखल घेऊन नाट्यगृहात तातडीने पार्किंग व शौचालयाची सुविधा उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी शहरवासीयांकडून होत आहे. रस्त्यावर अस्ताव्यस्त पार्किंगमुळे आपत्कालीन सेवांनाही अडथळा निर्माण होत असल्याने भविष्यात एखादा मोठा अनर्थ घडण्यापूर्वी पालिका प्रशासनाने ठोस उपाययोजना करावी, अशी अपेक्षा नागरिक व्यक्त करीत आहेत.

वीरभूमी हे पत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक- महादेव एकनाथ दळे यांनी आदिनाथ प्रिंटिंग प्रेस, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर, ४१४५०५ येथे मुद्रित करून तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर- ४१४१०६ येथे प्रसिद्ध केले. संपादक- महादेव दळे, पत्ता- कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर मो. ९४२०८०२१४५ Email - mahadevdale@gmail.com वेबसाईट : www. veerbhuminews.com

SPOT NEWS

## केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले रविवारी अहिल्यानगर दौऱ्यावर

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

केंद्रीय राज्यमंत्री तथा सामाजिक न्याय व सक्षमीकरण मंत्री ना. रामदास आठवले हे रविवारी (दि. ९ ऑगस्ट) अहिल्यानगर जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत असून, शहरातील वृंदावन लॉन्स येथे आयोजित करण्यात आलेल्या रिपब्लिकन पक्षाचे ज्येष्ठ पदाधिकारी कै. अशोक गायकवाड यांच्या शोकसभेस ते प्रमुख उपस्थिती लावणार आहेत. दुपारी १.४५ वाजता ना. आठवले शोकसभेच्या ठिकाणी उपस्थित राहणार असल्याची माहिती रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे (आठवले) जिल्हाध्यक्ष सुनील साळवे यांनी दिली. कै. अशोक गायकवाड हे रिपब्लिकन पक्षाचे ज्येष्ठ व निष्ठावंत पदाधिकारी म्हणून दीर्घकाळ कार्यरत होते. त्यांनी केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांच्यासोबत राजकीय तसेच सामाजिक क्षेत्रात काम केले होते. पक्षाच्या संघटनात्मक बांधणीत तसेच सामाजिक चळवळीमध्ये त्यांनी दिलेले योगदान महत्त्वपूर्ण असल्याचे साळवे यांनी सांगितले. त्यांच्या निधनाने रिपब्लिकन पक्षाच्या कार्यकर्त्यांमध्ये शोककळा पसरली असून, त्यांच्या स्मृतींना अभिवादन करण्यासाठी या शोकसभेस केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले उपस्थित राहून कै. अशोक गायकवाड यांच्या सामाजिक व राजकीय कार्याला आदरांजली अर्पण करणार आहेत. यावेळी पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते, सामाजिक क्षेत्रातील व्यक्तींना शोकसभेस उपस्थित राहण्याचे आवाहन साळवे यांनी केले आहे. ना. रामदास आठवले हे सकाळी ११ वाजता छत्रपती संभाजीनगर येथील विमानतळावरून अहिल्यानगरकडे रवाना होतील. त्यानंतर शहरातील वृंदावन लॉन्स येथे आयोजित कै. अशोक गायकवाड यांच्या शोकसभेस ते दुपारी १.४५ वाजता उपस्थित राहणार आहेत.

## कोतूळ येथील ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. देविदास देशमुख यांचे निधन

**● अकोले । वीरभूमी–**



येथील ज्येष्ठ विधिज्ञ तथा सामाजिक क्षेत्रात सक्रिय असलेले ॲड. देविदास देशमुख (वय ७८) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या निधनाने कोतूळसह पंचक्रोशीत शोककळा पसरली असून विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी तीव्र दुःख व्यक्त केले आहे. ॲड. देशमुख यांनी दीर्घकाळ वकिली व्यवसाय करताना सर्वसामान्यांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रामाणिकपणे कार्य केले. कायद्यावरील प्रभुत्व, अभ्यासू वृत्ती आणि समाजहिताची भूमिका यामुळे त्यांनी नागरिकांचा विश्वास संपादन केला होता. त्यांच्या पश्चात पत्नी, पुत्र पत्रकार निरंजन देशमुख व वैभव देशमुख, तीन भाऊ, भावजया, सुना, नातवंडे तसेच अन्य नातेवाईक असा मोठा परिवार आहे.

# हंगा तलावात केवळ १५ टक्के पाणीसाठा

### पारनेर शहरावर पाणीटंचाईचे सावट । शेती, जनावरे आणि नागरिकांच्या पाण्याचा प्रश्न गंभीर

**● पारनेर । वीरभूमी –**

पावसाने पाठ फिरवल्याने आणि उन्हाळ्याची तीव्रता वाढत चालल्याने पारनेर शहराची मुख्य जलवाहिनी असलेल्या हंगा तलावातील पाणीसाठा झपाट्याने खालावला आहे. सध्या तलावात केवळ १५ टक्के पाणीसाठा शिल्लक असल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली आहे. त्यामुळे हंगा तलावावर अवलंबून असलेल्या पारनेर शहरासमोर आगामी काळात तीव्र पाणीटंचाईचे संकट उभे राहण्याची शक्यता आहे.

हंगा तलाव हा परिसरातील शेती तसेच पिण्याच्या पाण्याचा प्रमुख स्रोत आहे. पारनेर शहराची नळयोजना आणि जनावरांच्या पिण्याच्या पाण्याची गरजही या तलावावर अवलंबून आहे. मात्र, मागील काही महिन्यांतील अल्प पाऊस आणि भूगर्भातील पाण्याची पातळी खालावल्याने तलावातील पाणीसाठा वेगाने कमी झाला आहे. सध्या तळाशी गेलेल्या पाणीसाठ्यामुळे पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर बनला आहे.



पाण्याअभावी परिसरातील रब्बी पिके धोक्यात आली असून, हंगामी पिकांना पाणी देणे शेतकऱ्यांना कठीण झाले आहे. अनेक ठिकाणी भाजीपाला व फळबागांवरही पाण्याअभावी परिणाम होत आहे. जनावरांच्या चारा आणि पाण्याचा प्रश्नही गंभीर बनत चालला असून, पशुपालकांसमोर जनावरांना पाणी कोठून उपलब्ध करून द्यायचे, असा प्रश्न निर्माण झाला आहे. लवकर पाऊस झाला नाही किंवा पर्यायी पाणीपुरवठ्याची व्यवस्था करण्यात आली नाही, तर शेतकऱ्यांना मोठ्या आर्थिक संकटाला सामोरे जावे लागू शकते.

या गंभीर परिस्थितीची दखल घेऊन स्थानिक प्रशासनाने आतापासूनच उपाययोजना करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे. पाण्याचा अपव्यय टाळणे, पिण्याच्या पाण्याचा आवश्यक साठा करणे आणि गरज भासल्यास टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू करणे, यावर प्रशासनाने भर देण्याची गरज आहे. नागरिकांनीही पाण्याचा काटकसरीने वापर करावा, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

सध्याच्या परिस्थितीवर मात करण्यासाठी प्रशासनाच्या प्रयत्नांसोबतच प्रत्येक नागरिकाने पाण्याचा प्रत्येक थेंब जपून वापरणे काळाची गरज बनली आहे. अन्यथा आगामी काळात पाण्यासाठी नागरिकांना वणवण करण्याची वेळ येण्याची शक्यता आहे.

**पाणीपुरवठ्याच्या पाईपलाईनची अडचण**

■ सुपा–पारनेर रस्त्याचे काम सुरू असल्याने एमआयडीसीकडून शहराला पाणीपुरवठा करणारी पाईपलाईन तुटली आहे. त्यामुळे भविष्यात पारनेर शहराला पाणीपुरवठा करणे आणखी अवघड होणार आहे. या तुटलेल्या पाईपलाईनबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांकडे वेळोवेळी पाठपुरावा केला आहे. मात्र, संबंधित विभागाकडून अद्याप दखल घेतली जात नाही.

**– डॉ. विद्या कावरे,**
नगराध्यक्ष, नगरपंचायत पारनेर

## राज्य पॉवरलिफ्टिंग स्पर्धेत अनुराधा मिश्रा यांची सुवर्ण कामगिरी

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**

शहरातील पॉवरलिफ्टर अनुराधा रत्नेश मिश्रा यांनी राज्यस्तरीय पॉवरलिफ्टिंग स्पर्धेत दैदिप्यमान कामगिरी करत पाच सुवर्णपदके आणि पाच मानाच्या ट्रॉफी पटकावून अहिल्यानगरच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. देवनार कॉलनी, गोवंडी (मुंबई) येथे छत्रपती संभाजीनगर सार्वजनिक गणेश उत्सव मंडळाच्या वतीने नुकत्याच पार पडलेल्या महाराष्ट्र राज्य पॉवरलिफ्टिंग स्पर्धा२०२६ मध्ये त्यांनी विविध गटांमध्ये वर्चस्व गाजवत 'स्ट्राँग वूमन ऑफ महाराष्ट्र' या मानाच्या किताबांसह उल्लेखनीय यश संपादन केले.

ही स्पर्धा म्युचर पॉवरलिफ्टिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्र यांच्या मान्यतेने आयोजित करण्यात आली होती. राज्यभरातील नामांकित पॉवरलिफ्टर्सनी या स्पर्धेत सहभाग घेतला होता. अत्यंत चुरशीच्या वातावरणात झालेल्या स्पर्धेत अनुराधा मिश्रा यांनी आपल्या ताकद, तांत्रिक कौशल्य आणि आत्मविश्वासाच्या जोरावर सर्वांचे लक्ष वेधून घेत अनेक गटांत सुवर्णपदकांची कमाई केली.

## पाथर्डी, राहुरी, कोपरगाव व नगर शहरात संघटनात्मक विस्ताराला बळ; महिला आघाडी अधिक सक्षम करण्याचा निर्धार

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (गवई) पक्षाच्या संघटनात्मक विस्तारासाठी सुरु असलेल्या पक्ष बांधणी उपक्रमातर्गत पाथर्डी, राहुरी, कोपरगाव तसेच नगर शहरातील महिलांनी पक्षात जाहीर प्रवेश केला. या पक्षप्रवेशामुळे जिल्ह्यातील महिला आघाडीला अधिक बळ मिळणार असून आगामी काळात पक्षाची संघटनात्मक ताकद वाढविण्यासाठी महिला कार्यकर्त्यांची भूमिका महत्त्वाची ठरणार असल्याची भूमिका रिपाइंचे शहर जिल्हाध्यक्ष सुशांत म्हस्के आणि महिला शहर जिल्हाध्यक्षा ज्योतीताई पवार यांनी मांडली.

पक्षात प्रवेश करणाऱ्या महिलांचे स्वागत करून रिपाईच्या वतीने सत्कार करण्यात आला. पक्षाच्या विचारधारेवर विश्वास व्यक्त करीत सामाजिक न्याय, समता आणि वंचित घटकांच्या हक्कांसाठी काम करण्याचा निर्धार यावेळी नव्याने पक्षात दाखल झालेल्या महिलांनी व्यक्त केला. या प्रवेश कार्यक्रमात ताई पगारे यांची रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (गवई)च्या कोपरगाव तालुका अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली. ताई पगारे यांच्या नेतृत्वाखाली कोपरगाव तालुक्यात पक्षाची महिला आघाडी अधिक मजबूत करून गावागावात पक्षाची शाखा स्थापन करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

भारती गव्हाळे, ऋतुजा गव्हाळे, सोनाली बळीद, रीना पाटोळे, रेश्मा जाधव आणि प्रियंका पठारे यांनी यावेळी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (गवई)मध्ये प्रवेश केला. पक्षात नव्याने दाखल झालेल्या सर्व महिला कार्यकर्त्यांचे पदाधिकाऱ्यांनी स्वागत केले. यावेळी सारिका साळवे, विश्रांती पठारे, संपदा म्हस्के, शीतल नाटिकर, संगीता पाटोळे, गुलाम शेख, विजय शिरसाठ, नईम शेख, लकी वाघमारे, योहान चाबुकस्वार, स्वप्नील साठे आदी उपस्थित होते.

# वैद्यकीय खर्च वाढला; आरोग्य विमा जनजागृतीसाठी स्टार हेल्थचा रोडशो

### महाराष्ट्रातील ५० हून अधिक शहरांत २२ जुलै ते २० ऑगस्ट दरम्यान अभियान । आर्थिक संरक्षणासह प्रतिबंधात्मक आरोग्यसेवेवर भर

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**

वैद्यकीय आणीबाणीच्या प्रसंगी कुटुंबांसमोर दोन मुख्य चिंता तातडीने उभ्या ठाकतात: दर्जेदार उपचारांची उपलब्धता आणि त्यानंतर येणारा आर्थिक भार सांभाळण्याची क्षमता. अलिकडच्या वर्षांत भारतात आरोग्य विम्याचा विस्तार लक्षणीयरित्या झाला असला, तरी अनेक कुटुंबांना अजूनही आरोग्यावरील उपचारांसाठी स्वतःच्या खिशातून मोठा खर्च करावा लागत आहे. यामुळे आर्थिक पूर्वतयारी हा संपूर्ण आरोग्य सुरक्षेचा एक अत्यंत महत्त्वाचा भाग बनला आहे.

या जागरूकतेतील दरी भरून काढण्यासाठी, भारतातील पहिली स्वतंत्र (स्टँडअलोन) आरोग्य विमा कंपनी असलेल्या स्टार हेल्थ अँड अलाईड इन्शुरन्स कंपनी लिमिटेडने (NSE: STARHEALTH; BSE: 543412) संपूर्ण महाराष्ट्रात महिनाभर चालणारा आरोग्य विमा जागरूकता रोडशो सुरू केला आहे. हा रोडशो २२ जुलै २०२६ रोजी सुरू झाला आहे आणि २० ऑगस्ट २०२६ पर्यंत सुरू राहणार आहे.

खास तयार करण्यात आलेली ही जागरूकता व्हॅन पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा, विदर्भ, उत्तर महाराष्ट्र आणि पुणे विभागातील ५० हून अधिक शहरे व गावांमधून प्रवास करत आहे. या दरम्यान कुटुंबं, ज्येष्ठ नागरिक, विद्यार्थी, स्वयंरोजगार व्यावसायिक आणि स्थानिक व्यावसायिक यांच्याशी प्रत्यक्ष संवाद साधला जात आहे. या प्रत्यक्ष लोकसंवादाच्या माध्यमातून आरोग्य विमा समजण्यास सोपा करणे, तसेच प्रतिबंधात्मक आरोग्य सेवा, आर्थिक पूर्वतयारी आणि दर्जेदार वैद्यकीय उपचारांची उपलब्धता याविषयी संवादाला प्रोत्साहन देणे हा या उपक्रमाचा उद्देश आहे.

सरकारी अंदाजानुसार, देशभरात आरोग्य विम्याचा विस्तार मोठ्या प्रमाणावर झाला आहे. तथापि, भारतातील एकूण आरोग्य खर्चात नागरिकांना स्वतःच्या खिशातून करावा लागणारा खर्च (ओओपीई) अजूनही ४३.४ टक्केआ आहे. यावरून वैद्यकीय आणीबाणीच्या प्रसंगी आर्थिक संरक्षणाबाबत अधिक जागरूकतेची निरंतर गरज स्पष्ट होते.




या उपक्रमाबद्दल मत व्यक्त करत स्टार हेल्थ इन्शुरन्सचे बिझनेस हेड श्री. विजय अरोरा म्हणाले, भारतातील आरोग्य विम्याचा प्रवास आता केवळ विम्याची पोहोच वाढवण्यापुरता मर्यादित राहिला नसून लोकांमध्ये समज, विश्वास आणि आत्मविश्वास निर्माण करण्याचा आहे. आमची 'सर्वांसाठी विमा' संकल्पना म्हणजेच प्रत्येक कुटुंबाला, ते कुठेही राहत असोत, वैद्यकीय आणीबाणीच्या काळात विश्वासार्ह आर्थिक संरक्षण मिळणे सुनिश्चित करणे ही आहे. या रोडशोच्या माध्यमातून, कोणतेही संकट येण्यापूर्वीच कुटुंबांनी आरोग्य संरक्षण आणि आर्थिक पूर्वतयारीचा विचार करावा यासाठी आम्ही त्यांना प्रोत्साहित करू इच्छितो. नागरिकांना त्यांच्या स्वतःच्या स्थानिक समुदायात भेटून, त्यांच्या समस्या ऐकून आणि त्यांच्या प्रश्नांची प्रत्यक्ष उत्तरे देऊन आरोग्य विमा अधिक सोपा आणि सुलभ करणे ही आमची अपेक्षा आहे. व्यक्ती आणि कुटुंबांना आपले आरोग्य व वित्त या दोन्ही गोष्टींचे रक्षण करण्याबाबत अधिक आत्मविश्वास वाटेल हे सुनिश्चित करणे हे आमचे ध्येय आहे.

या संपूर्ण अभियानादरम्यान, स्टार हेल्थचे प्रतिनिधी कमी वयातच आरोग्य विमा घेण्याचे महत्त्व, पुरेशी विमा रक्कम, कॅशलेस हॉस्पिटलायझेशन, प्रतिबंधात्मक आरोग्य काळजी आणि दीर्घकालीन आर्थिक नियोजन यांसारख्या विषयांवर स्थानिक नागरिकांशी संवाद साधतील. विम्याच्या गुंतागुंतीच्या संकल्पना सोप्या करणे आणि लोकांना स्वतःसाठी व त्यांच्या कुटुंबासाठी योग्य निर्णय घेण्यास मदत करणे, अशा प्रकारे या उपक्रमाची रचना करण्यात आली आहे.

या रोडशोला भेट देणाऱ्यांना कंपनीची सहाय्यक सेवा असलेल्या टॉक टू स्टारबद्दलही माहिती मिळेल. ही सेवा पात्र पॉलिसीधारकांना रुग्णालयात दाखल होण्यापूर्वी (नियोजित हॉस्पिटलायझेशनच्या वेळी) नेटवर्क हॉस्पिटल्सची माहिती, आवश्यक कागदपत्रे, कॅशलेस उपचारांची प्रक्रिया आणि उपचारांचे मार्ग याबाबत मार्गदर्शन करून मदत पुरवते.

याशिवाय, या रोडशोमध्ये होम हेल्थ केअर (एचएचसी) सेवांचेही प्रदर्शन केले जात आहे. वैद्यकीयदृष्ट्या योग्य असल्यास, पात्र रुग्णांना त्यांच्या स्वतःच्या घरातच दर्जेदार वैद्यकीय उपचार मिळणे याद्वारे शक्य होते. यामुळे रुग्णालयातील दीर्घकाळ मुक्कामाची गरज कमी होते आणि रुग्णाच्या लवकरात लवकर बरे होण्यास मदत होते.

जागरूकतेचे प्रयत्न अधिक व्यापक करण्यासाठी, स्टार हेल्थ प्रादेशिक माध्यमे, हायपरलोकल डिजिटल प्लॅटफॉर्म्स, कंटेंट क्रिएटर्स आणि शहरातील सोशल मीडिया कम्युनिटीजसोबत भागीदारी करत आहे, जेणेकरून आरोग्य विमा आणि प्रतिबंधात्मक आरोग्य सेवेबाबतचा संवाद केवळ प्रत्यक्ष (ऑन–ग्राउंड) संवादापुरता मर्यादित न राहता अधिक लोकांपर्यंत पोहोचू शकेल. हा रोडशो २० ऑगस्टपर्यंत महाराष्ट्रात आपला प्रवास सुरू ठेवणार आहे. आरोग्य विमा अधिक समजण्याजोगा, सुलभ आणि दैनंदिन जीवनाशी सुसंगत बनवून आपली 'सर्वांसाठी विमा' संकल्पना प्रत्यक्ष जनतेपर्यंत पोहोचवणे हा स्टार हेल्थचा उद्देश आहे.

https://www.pib.gov.in/PressReleasePage.aspx?PRID=2265816 भारतातील आरोग्य विम्याचा प्रवास आता केवळ विम्याची पोहोच वाढवण्यापुरता मर्यादित राहिला नसून लोकांमध्ये समज, विश्वास आणि आत्मविश्वास निर्माण करण्याचा आहे. आमची 'सर्वांसाठी विमा' संकल्पना म्हणजेच प्रत्येक कुटुंबाला, ते कुठेही राहत असोत, वैद्यकीय आणीबाणीच्या काळात विश्वासार्ह आर्थिक संरक्षण मिळणे सुनिश्चित करणे ही आहे. या रोडशोच्या माध्यमातून आम्ही स्थानिक समुदायांशी प्रत्यक्ष संवाद साधला, त्यांच्या शंकांचे निरसन केले आणि आज आरोग्य विमा हा केवळ क्लेम सेटलमेंटपुरता मर्यादित राहिला नसून त्याहून अधिक व्यापक आहे हे दाखवून दिले. टॉक टू स्टार आणि होम हेल्थ केअरसारख्या सेवांद्वारे आम्ही ग्राहकांना त्यांच्या आरोग्याचा प्रवास अधिक आत्मविश्वासाने आणि सोयीस्करपणे पूर्ण करण्यास मदत करत आहोत.

या अभियानादरम्यान, स्टार हेल्थच्या प्रतिनिधींनी उपस्थितांशी प्रतिबंधात्मक आरोग्य काळजी, वेळेवर पॉलिसी खरेदी करणे, कॅशलेस हॉस्पिटलायझेशन, पुरेशी विमा रक्कम आणि दीर्घकालीन आर्थिक नियोजन अशा विविध विषयांवर संवाद साधला. विम्याच्या संकल्पना सोप्या करणे आणि लोकांना आरोग्याविषयी योग्य निर्णय घेण्यास मदत करणे हा या उपक्रमाचा उद्देश होता.

याशिवाय, रोडशोला भेट देणाऱ्यांना टॉक टू स्टार या स्टार हेल्थच्या विशेष सहाय्यक सेवेची माहिती देण्यात आली. ही सेवा नियोजित हॉस्पिटलायझेशन आणि होम हेल्थ केअरसाठी पात्र पॉलिसीधारकांना रुग्णालयात दाखल होण्यापूर्वी नेटवर्क हॉस्पिटल्स, कॅशलेस प्रक्रिया, आवश्यक कागदपत्रे आणि उपचारांचे मार्ग समजून घेण्यास मदत करते.

या रोडशोमध्ये कंपनीच्या होम हेल्थ केअर (एचएचसी) सेवेवरही भर देण्यात आला. वैद्यकीयदृष्ट्या योग्य असल्यास, या सेवेद्वारे पात्र रुग्णांना त्यांच्या स्वतःच्या घरातच दर्जेदार वैद्यकीय उपचार मिळणे शक्य होते, ज्यामुळे रुग्णालयातील दीर्घकाळ मुक्कामाची गरज कमी होते.

लोकसंवाद अधिक प्रबळ करण्यासाठी, या अभियानाने प्रादेशिक माध्यमे, हायपरलोकल डिजिटल प्लॅटफॉर्म्स, यूट्यूब क्रिएटर्स आणि शहरातील सोशल मीडिया कम्युनिटीजसोबत सहयोग केला. यामुळे आरोग्य विम्यासंदर्भातील संवाद प्रत्यक्ष भेटीगाठींच्या पलीकडे नेऊन नागरिकांचा व्यापक सहभाग मिळवून देण्यास मदत झाली. संपूर्ण भारतात आरोग्याशी संबंधित गरजा बदलत असताना, स्टार हेल्थ नाविन्यपूर्ण उत्पादने, तंत्रज्ञानाधारित आरोग्य सेवा, लोकसहभाग आणि ग्राहक–प्रथम उपक्रमांच्या माध्यमातून आपली 'सर्वांसाठी विमा' संकल्पना पुढे नेण्यासाठी कटिबद्ध आहे; जेणेकरून दर्जेदार आरोग्य विमा प्रत्येक भारतीय कुटुंबासाठी अधिक सुलभ, समजण्यास सोपा आणि सुसंगत बनेल.

* स्टार हेल्थचा महाराष्ट्रात ३० दिवसांचा आरोग्य विमा जागरूकता रोडशो.
* २२ जुलै ते २० ऑगस्टदरम्यान ५० हून अधिक शहरांमध्ये उपक्रम.
* आरोग्य विमा, आर्थिक नियोजन आणि प्रतिबंधात्मक आरोग्यसेवेवर भर.
* 'टॉक टू स्टार' आणि 'होम हेल्थ केअर' सेवांची माहिती.
* कुटुंबे, ज्येष्ठ नागरिक आणि तरुणांना आरोग्य विम्याबाबत जागरूकता.
* सरकारी आरोग्य विम्याचे ग्रामीण भागात ४५.५%, शहरी भागात ३१.८% संरक्षण.
* देशातील आरोग्य खर्चापैकी ४३.४% खर्च नागरिकांचा स्वतःच्या खिशातून.
* ग्राहक–केंद्रित आणि तंत्रज्ञानाधारित आरोग्यसेवांचा रोडशोमध्ये परिचय.

# काकडे, पुरनाळे कुटुंबाने स्वहितापेक्षा समाजहिताला प्राधान्य दिले

## आमदार विवेक कोल्हे । काकडे शैक्षणिक समूहाच्या कॅम्पसचे 'डॉ. त्रिंबकराव पुरनाळे कॅम्पस' नामकरण; युवाशक्ती क्रिकेट करंडक स्पर्धेचे उद्घाटन



■ छाया । अमोल कराळे

**● शेवगाव । वीरभूमी–**

सार्वजनिक कामे, पाणी चळवळ, समाजसेवा आणि शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणारे काकडे कुटुंब म्हणून परिचित आहे. काकडे आणि पुरनाळे कुटुंबांनी कायम स्वहितापेक्षा समाजहिताला प्राधान्य दिले. प्रतिकूल परिस्थितीतही पूर्वजांनी धैर्याने समाजकारणाची वाटचाल करीत आदर्श निर्माण केला. त्यांच्या कार्याचा वारसा आजच्या पिढीसाठी प्रेरणादायी आहे. राज्य आणि राष्ट्राचे भविष्य घडवायचे असेल, तर इतिहासाची पाने उलगडून त्यातून प्रेरणा घेण्याची गरज आहे, असे प्रतिपादन विधान परिषदेचे सदस्य आमदार विवेक कोल्हे यांनी केले.

कर्मयोगी आबासाहेब काकडे शैक्षणिक समूहाच्या शेवगाव येथील गणेशनगर कॅम्पसचे 'डॉ. त्रिंबकराव पुरनाळे कॅम्पस' असे नामकरण करण्यात आले. तसेच 'युवाशक्ती क्रिकेट करंडक' क्रिकेट स्पर्धेचे उद्घाटन आमदार विवेक कोल्हे यांच्या हस्ते झाले. यानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

यावेळी कर्मयोगी आबासाहेब काकडे शैक्षणिक समूहाचे अध्यक्ष ॲड. शिवाजीराव काकडे, जिल्हा परिषदेच्या माजी सदस्या हर्षदा काकडे, विश्वस्त पृथ्वीसिंह काकडे, जगन्नाथ गावडे, भगूरचे सरपंच वैभव पुरनाळे, राम पोटफोडे, प्रमोद तांबे, लहू जायभाये आदी उपस्थित होते.

आमदार कोल्हे म्हणाले की, आजची जनरेशन-झेड पिढी राजकारणापासून दूर गेलेली नसून अधिक जागरूक आणि सतर्क झाली आहे. या पिढीला योग्य दिशा देणे ही समाजाची जबाबदारी आहे. तरुणांनी नवीन तंत्रज्ञान आत्मसात करण्याबरोबरच शालेय जीवनापासून कौशल्यविकासावर भर द्यावा. उपलब्ध वेळेचा योग्य उपयोग करून व्यक्तिमत्त्व विकास साधावा.

मोबाईलच्या वाढत्या वापराबाबत त्यांनी युवकांना सावध केले. जगभरातील स्क्रीन टाइमच्या तुलनेत भारतातील प्रमाण मोठे आहे. विद्यार्थ्यांमध्ये ताण-तणावाचे प्रमाण वाढत असल्याने मोबाईलचा वापर केवळ मनोरंजनासाठी न करता स्व-विकासासाठी जबाबदारीने करणे आवश्यक आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या युगात बदलत्या तंत्रज्ञानाशी जुळवून घेताना प्रत्येकाने योग्य आदर्श डोळ्यासमोर ठेवून सक्षम व्यक्तिमत्त्व घडवावे, असेही त्यांनी सांगितले.

कर्मयोगी आबासाहेब काकडे शैक्षणिक समूहाचे विश्वस्त पृथ्वीसिंह काकडे म्हणाले की, दिवंगत माजी मंत्री शंकरराव कोल्हे आणि डॉ. त्रिंबकराव पुरनाळे यांच्यात जिव्हाळ्याचे संबंध होते. दोन्ही परिवारांना समाजकारण, राजकारण आणि लोकचळवळीचा समृद्ध वारसा लाभला आहे. तरुण एकत्र आले की समाजात परिवर्तन घडते, हे इतिहासाने सिद्ध केले आहे. समाजात सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी युवकांचे संघटन आवश्यक आहे. याच उद्देशाने तालुक्यातील युवकांच्या भेटी घेऊन त्यांच्या समस्या जाणून घेणे आणि त्या सोडविण्यासाठी सातत्याने प्रयत्न करण्याचा उपक्रम सुरू असल्याचे त्यांनी सांगितले.

युवकांमध्ये क्रीडाभावना वाढावी, त्यांना आपले कौशल्य दाखविण्यासाठी व्यासपीठ मिळावे आणि त्यांच्यात एकोपा निर्माण व्हावा, या उद्देशाने 'युवाशक्ती क्रिकेट करंडक' स्पर्धेचे आयोजन करण्यात आल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

शेवगाव व पाथर्डी तालुक्यातील एकूण २७ संघांनी पाच दिवसीय 'युवाशक्ती क्रिकेट करंडक' स्पर्धेत सहभाग घेतला आहे.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. लक्ष्मण बिटाळ यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. ज्ञानेश्वर गरड व प्रा. जरीना शेख यांनी केले, तर लक्ष्मण गवळी यांनी आभार मानले.

# अर्जुन लांडगे यांचा पदोन्नतीनिमित्त चोराचीवाडी सोसायटीतर्फे सत्कार



■ छाया । विजय उंडे

**● श्रीगोंदा । वीरभूमी–**

महाराष्ट्र शासनाच्या नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई येथे अवर सचिव (क्लास १) पदावर पदोन्नती झाल्याबद्दल चोराचीवाडीचे सुपुत्र श्री. अर्जुन ज्ञानदेव लांडगे यांचा चोराचीवाडी विविध कार्यकारी सहकारी सोसायटी व ग्रामस्थांच्या वतीने शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

यावेळी सोसायटीचे चेअरमन तुकाराम चव्हाण, व्हा. चेअरमन संतोष साळुंके, संचालक कालिदास चोर यांनी मनोगत व्यक्त करून अर्जुन लांडगे यांच्या पुढील प्रशासकीय वाटचालीस शुभेच्छा दिल्या. त्यांच्या पदोन्नतीमुळे गावाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

सत्काराला उत्तर देताना अर्जुन लांडगे यांनी ग्रामस्थांनी दिलेल्या प्रेम व सन्मानाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. गावकऱ्यांचे प्रेम, आशीर्वाद आणि शुभेच्छा हीच पुढील कार्याची प्रेरणा असल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमास सोसायटीचे पदाधिकारी, संचालक, सभासद, ग्रामपंचायत पदाधिकारी, सामाजिक कार्यकर्ते व ग्रामस्थ उपस्थित होते. प्रस्तावित विठ्ठल साळुंके यांनी केले, तर आभार हरिदास अनभुले यांनी मानले. कार्यक्रमानंतर अर्जुन लांडगे यांनी ग्रामस्थांशी हितगुज केले तसेच प्रल्हाद महाराज विद्यालयास भेट देऊन विद्यार्थ्यांशी संवाद साधला.

# 'व्यसनाला नाही, जीवनाला होकार द्या'

## नशामुक्त भारत अभियानांतर्गत शेवगावात विद्यार्थ्यांसाठी जनजागृती



■ छाया । अमोल कराळे

**● शेवगाव । वीरभूमी–**

विद्यार्थ्यांवर योग्य संस्कार घडविण्याचे काम शाळा आणि महाविद्यालयांच्या माध्यमातून प्रभावीपणे होऊ शकते. विद्यार्थ्यांनी व्यसनांपासून दूर राहून स्वतःसोबत कुटुंब व समाजालाही नशामुक्त करण्यासाठी पुढाकार घ्यावा. मोबाईलचा अतिवापर तसेच तंबाखू, गुटखा, धूम्रपान, मद्यपान आदी व्यसनांपासून दूर राहावे, असे आवाहन शेवगाव येथील ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालयाच्या पुष्पा दीदी यांनी केले.

सामाजिक न्याय व सक्षमीकरण मंत्रालय, गृह मंत्रालय आणि अमली पदार्थ नियंत्रण ब्युरो यांच्या संयुक्त सहभागातून राबविण्यात येणाऱ्या 'नशामुक्त भारत अभियान' अंतर्गत विद्यार्थ्यांसाठी विशेष जागरूकता सत्राचे आयोजन प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालयाच्या वतीने प्रवरा मेडिकल ट्रस्ट संचलित डॉ. बाळासाहेब विखे पाटील सीबीएसई स्कूल आणि शेवगाव इंग्लिश मीडियम स्कूल येथे करण्यात आले. यावेळी पुष्पा दीदी बोलत होत्या.

यावेळी डॉ. बाळासाहेब विखे पाटील सीबीएसई स्कूलच्या प्राचार्या वर्षा दारकुंडे, उपप्राचार्य विजय चन्ने, शेवगाव इंग्लिश मीडियम स्कूलचे उपप्राचार्य रमेश कवडे आदी उपस्थित होते.

पुष्पा दीदी म्हणाल्या की, अमली पदार्थ, तंबाखूजन्य पदार्थ, मद्यपान तसेच इतर व्यसनांमुळे शारीरिक, मानसिक, सामाजिक आणि शैक्षणिक दुष्परिणाम होतात. व्यसनाधीनतेचा परिणाम केवळ व्यक्तीच्या आरोग्यावर होत नाही, तर कुटुंब आणि समाजावरही त्याचे विपरीत परिणाम होतात. त्यामुळे विद्यार्थ्यांनी निरोगी शरीर, सकारात्मक विचार, शिस्तबद्ध जीवनशैली आणि व्यसनमुक्त भवितव्य याबाबत सजग राहावे.

विद्यार्थ्यांनी आयुष्यातील विविध प्रसंगांत योग्य निर्णय घ्यावेत, वाईट सवयींपासून दूर राहावे तसेच मित्रमैत्रिणींच्या चुकीच्या प्रभावाला बळी पडू नये, असे आवाहनही त्यांनी केले. 'व्यसनाला नाही, जीवनाला होकार' हा सकारात्मक संदेश यावेळी विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यात आला.

या जनजागृती कार्यक्रमात सहभागी नववी व दहावीच्या विद्यार्थ्यांना व्यसनमुक्तीची शपथ देण्यात आली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्या वर्षा दारकुंडे यांनी केले. सूत्रसंचालन कल्याण देवणे यांनी केले, तर संदीप गाढे यांनी आभार मानले.

या उपक्रमासाठी संस्थेचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र विखे पाटील, सहसचिव मोनिका सावंत, विश्वस्त ध्रुव राजेंद्र विखे पाटील तसेच कार्यकारी संचालक पंजाबराव आहेर पाटील यांचे मार्गदर्शन लाभले.

# नारायणगव्हाण शाळेच्या गुणवत्तेचे आमदार मुंदडा यांच्याकडून कौतुक

## अंदाज समितीच्या पाहणीत शैक्षणिक गुणवत्ता, शिष्यवृत्ती उपक्रमांसह भौतिक सुविधांची प्रशंसा

**● वडनेर । वीरभूमी –**

महाराष्ट्र विधानमंडळाच्या अंदाज समिती सदस्या तथा केज विधानसभा मतदारसंघाच्या आमदार नमिताताई मुंदडा यांनी पारनेर तालुक्यातील नारायणगव्हाण येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेला भेट देऊन शैक्षणिक गुणवत्ता, नाविन्यपूर्ण उपक्रम, भौतिक सुविधा तसेच विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची पाहणी केली.

यावेळी शिक्षणाधिकारी भास्कर पाटील, गटविकास अधिकारी दिलीप सोनकुसळे, गटशिक्षणाधिकारी तेजस्विनी पवार आदी उपस्थित होते.

शाळेचा स्वच्छ, सुंदर व रंगरंगोटी केलेला परिसर तसेच वृक्षारोपणामुळे निर्माण झालेले निसर्गरम्य वातावरण पाहून आमदार मुंदडा यांनी समाधान व्यक्त केले. त्यांनी शाळेतील इंटरॅक्टिव्ह बोर्ड, टॅब, शुद्ध पिण्याच्या पाण्याची फिल्टर व्यवस्था, मैदानावरील ब्लॉक तसेच सुसज्ज स्वच्छतागृहाची पाहणी केली. 'मिशन आपुलकी' अंतर्गत विद्यार्थ्यांना सुविधा उपलब्ध करून देणाऱ्या ग्रामपंचायत, सरपंच, ग्रामस्थ, मुख्याध्यापक व शिक्षकांचे त्यांनी कौतुक केले.

इयत्ता चौथी, पाचवी व सातवीच्या शिष्यवृत्ती परीक्षेसाठी राबविण्यात येणारे विशेष उपक्रम, अतिरिक्त मार्गदर्शन, सराव पेपर तसेच जिल्हा परिषदेच्या 'मिशन आरंभ' अंतर्गत सुरू असलेल्या गुणवत्तावर्धक कार्यक्रमांची त्यांनी माहिती घेतली. शिष्यवृत्ती क्षेत्रात शाळेने जिल्ह्यात निर्माण केलेल्या वेगळ्या ओळखीबद्दलही त्यांनी समाधान व्यक्त केले.

वर्गभेटीदरम्यान आमदार मुंदडा यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत शिष्यवृत्ती परीक्षेबाबत विविध प्रश्न विचारले. विद्यार्थ्यांनी आत्मविश्वासाने दिलेल्या उत्तरांचे कौतुक करून त्यांनी मुख्याध्यापक, शिक्षक व अधिकाऱ्यांच्या प्रयत्नांची प्रशंसा केली.

आमदार मुंदडा यांनी अंगणवाडी केंद्र, शालेय पोषण आहार उपहारगृह व धान्यसाठा खोलीची पाहणी केली. स्वयंपाकी व मदतनीस यांच्याशी संवाद साधून पोषण आहाराची गुणवत्ता, भाजीपाला, पूरक आहार, स्वच्छता व दैनंदिन आहार नियोजनाची माहिती घेतली.

शिक्षणाधिकारी भास्कर पाटील यांनी 'मिशन आपुलकी', गुणवत्तापूर्ण अध्यापन, शिष्यवृत्ती पूरक उपक्रम, नियोजन आणि विद्यार्थ्यांच्या यशस्वी वाटचालीची माहिती दिली. मुख्याध्यापक धोंडीभाऊ नांदखिले यांच्याकडून शालेय व्यवस्थापनाची, तर पदवीधर शिक्षक भरत शेळके यांच्याकडून शिष्यवृत्तीतील गुणवत्तेसाठी राबविण्यात येणाऱ्या विशेष उपक्रमांची माहिती घेण्यात आली.

इयत्ता सातवीच्या वर्गाला भेट दिली असता विद्यार्थ्यांनी चप्पल-बूट वर्गाबाहेर शिस्तबद्धपणे ठेवलेले दिसले. विद्यार्थ्यांनी स्वच्छता व शिस्तीचे पालन केल्याबद्दल आमदार मुंदडा यांनी त्यांचे कौतुक केले. सकाळी साडेनऊ वाजता होणाऱ्या



शिष्यवृत्ती मार्गदर्शन वर्गाची वेळ व स्वरूपाचीही त्यांनी माहिती घेतली. महामार्गालगत शाळा असल्याने विद्यार्थ्यांच्या वाहतुकीची व्यवस्था तसेच शाळेतील रिक्त पदांबाबतही त्यांनी विचारपूस केली.

अंदाज समितीच्या दौऱ्यासाठी मार्गदर्शन करणारे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, शिक्षणाधिकारी भास्कर पाटील, गटशिक्षणाधिकारी तेजस्विनी पवार, के. आर. ढवळे, शिक्षण विस्तार अधिकारी विनेश लाळगे, केंद्रप्रमुख अविनाश घोडके, सरपंच, उपसरपंच राजेश शेळके, ग्रामस्थ, माजी विद्यार्थी संघ व माजी सैनिक यांचे शाळेच्या वतीने आभार मानण्यात आले.

मुख्याध्यापक धोंडीभाऊ नांदखिले, पदवीधर शिक्षक भरत शेळके, रासकर सर, लोखंडे मॅडम, आलमले मॅडम, यादव मॅडम तसेच अंगणवाडी सेविका बढे मॅडम यांच्या विशेष प्रयत्नातून अंदाज समितीचा दौरा यशस्वी झाला.

यावेळी शाळा व शिक्षण विभागाच्या वतीने गटशिक्षणाधिकारी तेजस्विनी पवार यांच्या हस्ते आमदार नमिताताई मुंदडा यांचा शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ व पुस्तक देऊन सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाच्या शेवटी शिष्यवृत्ती परीक्षेतील उल्लेखनीय गुणवत्तेबद्दल उपस्थित अधिकाऱ्यांच्या हस्ते शाळेतील सर्व शिक्षकांचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. उपस्थित मान्यवरांनी शाळेच्या सातत्यपूर्ण प्रगतीबद्दल अभिनंदन करून भविष्यातही शैक्षणिक गुणवत्ता कायम राखण्यासाठी शुभेच्छा दिल्या.